# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १३ /१०/२०१७**

**सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १८/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १८/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>**अनुमोदक :- (शोभा मोरे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | प्रश्नोत्तरे | |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | **ठराव : -** विषय पत्रिकेसोबत शासकीय पत्रे जोडली आहेत. |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेचे कायदे विषयक बाबी पाहणा-या वकीलांच्या पॅनलचे पुर्नगठन करणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय:-** उपरोक्त सादर केलेल्या गोषवारा व त्या अनुषांगाने सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यांत आली. वसई विरार शहा महानगपालिकेचे कायदे विषयक बाबी करणा-या वकिलांची पॅनल, तात्कालीन चार नगरपालिकांच्या काळापासुन तसेच प्रशासकीय ठराव क्र. २७, दिनांक १२/०८/२००९ नुसार अस्तित्वात आहे. तात्कालीन पॅनल वरील वकिल मंडळी सद्दस्थितीत एकमेकांपासून विभक्त होऊन स्वतंत्ररित्या मे. कोर्टचे काम पाहत आहेत. या व अशा अनेक कारणांमुळे दाव्यांची संख्या प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता प्रलंबित दाव्यांसह नव्याने दाखल होणाऱ्या दाव्यांवर महापालिकेची प्रभावी बाजु मांडण्यासाठी , वसई विरार शहर महानगरपालिकेची आजची सर्वसाधारण सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.<br>१.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गोषवाऱ्यातील वकिलांबाबत आरोप केलेला आक्षेपार्ह मजकूर वगळण्यास ही सभा मान्यता देत असून वसई विरार शहर महानगरपालिकेचे विविध मे. न्यायालयात (तालुका न्यायालयापासुन ते सर्वोच्च न्यायालयात दाखल दाव्यात महापालिकेची बाजू मांडण्यासाठी निष्णांत वकिलांचे पॅनल नियुक्त करण्यात यावे.<br>२.महानगरपालिकेच्या मंजूर आकृती बंधानुसार न्यायालयीन विभागात रिक्त असलेल्या पदांबाबत प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यांत यावी तसेच वकिलाचे पॅनलची नियुक्ती करणेकामी येणा-या अपेक्षित खर्चास |

| | | |
|---|---|---|
| | | ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी प्रदान करीत आहे. याकामी वृत्तपत्रात व्यापक प्रसिद्धी देऊन ई-निविदा मागविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्राची कोलासो) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्थायी, रोजंदारी, अस्थायी व इतर कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** वसई - विरार शहर महानगपालिकेच्या आस्थापनेवरील नियमित वेतनश्रेणीवरील कायम कर्मचारी, महानगरपालिकेत वर्ग - १, वर्ग-२ व वर्ग-३ च्या पदावर प्रतिनियुक्ती/बदलीने कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना सन २०१६-१७ मधील प्रत्यक्ष कामकाजाचे २६६ दिवस विचारात घेऊन प्रतिदिन रु.४२/- च्या दरानुसार तथापि रु. ११,०८८/- रक्कमेच्या मर्यादेत सानुग्रह अनुदान देण्यात यावे. ठोक वेतनावर कार्यरत कर्मचारी, प्रकल्प अधिकारी, समुह संघटक, पेल्हार धरणावरील २५६ - ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका हद्दीत कार्यरत कर्मचाऱ्यांना तसेच इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटीअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना (आर.सी.एच.) माहे मार्च २०१७ मध्ये प्रत्यक्ष अदा झालेले वेतन / मानधन किंवा सानुग्रह अनुदानाची रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम सानुग्रह अनुदान म्हणुन अदा करणेस आजची ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. सन २०१७ चे दिवाळी सणानिमित्त द्यावयाचे सानुग्रह अनुदानापोटी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा वित्तीय व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (वृंदेश पाटील)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा पूर्व पश्चिम व विरार पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपूलावर (L.C.४० ROB) लिफ्ट व जिना बनविणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा पूर्व पश्चिम व विरार पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपूलावर (L.C.४० ROB) लिफ्ट व जिना बनविणे कामी होणारा अंदाजपत्रकीय रक्कम १ करोड प्रस्तावित असली तरी त्यात विरार पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या रेल्वे पुलावर लिफ्ट व जिना बनविणेचे अंदाजपत्रकाची रक्कम अंर्तभुत असल्याने नालासोपारा येथील उड्डाणपूलावरील लिफ्ट व जिना बनविणेचे अंदाजपत्रकासह विषयांकित दोन ही ठिकाणीच्या उड्डाणपूलावर लिफ्ट व जिना बनविणेकामी होणाऱ्या अंदाजित रक्कमेस हि सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ७. | **वसई विरार शहर महनगरपालिकेच्या विकास आराखडयातील मौजे: बोळींज आरक्षण क्र.१६२ (प्ले ग्राऊंड) मध्ये क्रिडा संकुल व क्लब हाऊस विकसीत करणे याकामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | प्रस्तावाचा निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे:बोळींज आरक्षण क्र.१६२ (प्ले ग्राऊंड) मध्ये क्रिडा संकुल व क्लब हाऊस विकसीत करणेकामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.३८,६२,२७,३६८/-) या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई- निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | **तत्कालीन नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपरिषदांकडे वर्ग झालेल्या पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई-फार्म वरील व रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांपैकी ५५ वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त करुन केंद्र शासनाच्या पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट १९७२ नुसार उपदानाचा लाभ अदा करणेबाबत, तसेच मयत कर्मचाऱ्यांचे वारसास उपदानाचा लाभ अदा करणेबाबत.** | निर्णय :- मा. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील दि. २२ ऑगस्ट, २००६ चा आदेश विचारात घेता पेल्हार धरण योजनेवरील ५५ वर्ष पूर्ण झालेल्या, १) श्री.व्ही. के. जाधव, २) श्री. जगन्नाथ पां. घरत, ३) श्री. रोमण डिसोजा व ४) श्री. पांडू रामा बिरादार या चार कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त करून त्यांना तसेच १) ) कै. टुल बहादूर थापा, २) कै. दिनकर पाटील व ३) ) कै. नारायण पाटील या तीन मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना केंद्र शासनाच्या पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट, १९७२ नुसार उपदानाचे लाभ अदा करण्यास आजची ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (वृंदेश पाटील)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | **सन २०१७-१८, २०१८-१९, व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका विरार पाणी पुरवठा विभागा अंतर्गत ( प्रभाग समिती अे व सी ) पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.** | ठराव/निर्णय :- सदर विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, पुढील ३ वर्षासाठी पाणी पुरवठा व्यवस्थापन कामी सादर केलेल्या अदांजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी पुढील निविदा कार्यवाही पुर्ण होवुन नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मागील वर्षाचे ठेकेदार यांना मुदतवाढ देण्यास व त्यानुसार वाढीव खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे))**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **सन २०१७-१८, २०१८-१९, व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर** | ठराव/निर्णय :- सदर विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, B,E,D, F (नालासोपार झोन) हा खुप मोठा असल्याने सदर झोनला दोन विभागात म्हणजे नालासोपारास व पेल्हार असे विभागुन वरील |

| | | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका नालासोपारा पाणी पुरवठा विभागांतर्गत ( प्रभाग समिती ब /ई/एफ/डी ) पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे बाबत.** | अंदाजपत्रकातील बाबींमध्ये कोणताही बदल न करता दोन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करुन दोन स्वतंत्र निविदा काढण्यासाठी आवश्यक<br>तांत्रिक बाबी तपासून निविदा काढण्यांत याव्यात .शक्य नसल्यास वरिलप्रमाणे अंदाजपत्रकीय खर्चानुसार संपूर्ण एकच निविदा काढण्यास तसेच नविन ठेकेदाराची नियूक्ती होईपर्यंत मागील वर्षाच्या ठेकेदारास दरास कोणतीही दरवाढ न देता मुदतवाढीस व खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे))**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | **सन २०१७-१८, २०१८-१९, व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका वसई पाणी पुरवठा विभागा अंतर्गत ( प्रभाग समिती आय ) पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देणे बाबत.** | **ठराव/निर्णय :-** सदर विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, पुढील ३ वर्षासाठी पाणी पुरवठा व्यवस्थापन कामी सादर केलेल्या अदांजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी पुढील निविदा कार्यवाही पुर्ण होवुन नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मागील वर्षाचे ठेकेदार यांना मुदतवाढ देण्यास व त्यानुसार वाढीव खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे))**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२ | **सन २०१७-१८, २०१८-१९, व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका नवघर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत ( प्रभाग समिती एच व जी ) पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देणे बाबत.** | **ठराव/निर्णय :-** सदर विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, पुढील ३ वर्षासाठी पाणी पुरवठा व्यवस्थापन कामी सादर केलेल्या अदांजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी पुढील निविदा कार्यवाही पुर्ण होवुन नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मागील वर्षाचे ठेकेदार यांना मुदतवाढ देण्यास व त्यानुसार वाढीव खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे))**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव**

**वसई विरार शहर महानगरपालिका**